## जाहिर प्रकटन

## दिनांक- ३०/०९/२०२१

### विकसक मे.चिंचवले डेव्हलपर्स यांचेकडील स.नं.३३५/अ, फा.प्लॉट क्र. १५७, घोरपडे, पेठ, पुणे येथील सोडत पध्दतीने सदनिकेचे वाटप करणेबाबत जाहिर प्रकटन

स.नं.३३५/अ, फा.प्लॉट क्र. १५७, घोरपडे, पेठ, पुणे येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजना विकसक मे.चिंचवले डेव्हलपर्स यांचेमार्फत राबविण्यात येत असून सदर योजनेचे बांधकाम पुर्णत्वास आले असल्याने योजनेतील झोपडीधारकांनी सोडत पध्दतीने सदनिका वाटप करणेबाबतचा विनंती अर्ज या विभागाकडे सादर केला होता.

विषयांकित योजनेमध्ये एकूण ७२ निवासी झोपडीधारक पात्र ठरले असून त्यांची योजनेतील निवासी सदनिकांची सोडत ही वार- मंगळवार, दि. २६/१०/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता झोपुप्रा कार्यालय ॥ मुथ्था चेंबर्स (विस्तार इमारत), सेनापती बापट मार्ग, पुणे- १६ येथे करण्यात येणार आहे. तसेच उक्त संपुर्ण सोडत प्रक्रियेचे व्हीडीओ शुटींग करण्यात येईल व ते चित्रीकरण सर्वांना पाहण्यासाठी झोपुप्राच्या वेबसाईटवर एक महिना ठेवण्यात येईल.

कोविड-१९ च्या संसर्गाच्या प्रसारामुळे सर्व ७२ निवासी पात्र झोपडीधारकांच्या संमतीने त्यांचे ०५ प्रतिनिधी सोडतीकरीता उपस्थित राहतील याची नोंद घ्यावी. याकरीता सर्व पात्र झोपडीधारकांच्या संमतीने ०५ प्रतिनिधींची नावे लेखी स्वरुपात दि. १२/१०/२०२१ पुर्वी झोपुप्रा कार्यालयाकडे द्यावयाची आहेत याची नोंद घ्यावी.

**सोडतीचा कालबध्द नियोजीतकार्यक्रम**

| अ.क्र. | तपशिल | दिनांक |
|---|---|---|
| १ | सदनिका सोडतीचे जाहिर प्रकटण प्रसिध्द करण्याचा दिनांक | गुरुवार दि ३०/०९/२०२१ |
| २ | अंध, दिव्यांग(अपंग), विधवा यांना सदनिका वाटपामध्ये निवडीची सवलत आवश्यक असल्यास त्यांनी त्यांचे संबंधित कागदपत्रे / पुरावे झोपुप्रा | शुक्रवार, दि.०८/१०/२०२१ रोजी कार्यालयीन वेळ संपेपर्यंत |

| | | |
|---|---|---|
| | कार्यालयात दाखल करण्याचा अंतिम दिनांक | |
| ३. | अंध, दिव्यांग(अपंग), विधवा यांचे पुरावे व कागदपत्रे झोपुप्रा कार्यालयाकडून तपासण्याचा कालावधी | शुक्रवार,दि.०८/१०/२०२१ ते बुधवार, दि. १३/१०/२०२१ |
| ४. | तपासणीनंतर पात्र आढळलेल्या अंध, दिव्यांग(अपंग), विधवा यांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | गुरुवार, दि.१४/१०/२०२१ |
| ५. | अंध, दिव्यांग(अपंग), विधवा यांचे प्रसिध्द करण्यात आलेल्या यादीवर हरकत/आक्षेप दाखल करण्याची अंतिम दिनांक | सोमवार,दि.१८/१०/२०२१ रोजी कार्यालयीन वेळ संपेपर्यंत |
| ६. | झोपुप्रा कार्यालयातील दाखल पुरावे व कागदपत्र यावरील आक्षेप / हरकती वर निर्णय व सोडतीसाठी अंतिम यादी प्रसिध्दी दिनांक | शुक्रवार , दि.२२/०२/२०२१ |
| ७. | सोडतीचा दिनांक,वेळ व ठिकाण | मंगळवार, दि.२६/१०/२०२१ स.११.०० वाजता<br>स्थळ:- ॥ मुथ्या चेंबर्स (विस्तार इमारत), सेनापती बापट मार्ग, पुणे- १६. |
| ८. | सोडत पुर्ण झालेनंतर निवड झालेल्या सर्व पात्र झोपडीधारकांची त्यांना वितरीत करण्यात आलेल्या सदनिकांसह यादीचा प्रसिध्दी दिनांक | गुरुवार, दिनांक २८/१०/२०२१<br>१.स्थळ:- ॥ मुथ्या चेंबर्स (विस्तार इमारत), सेनापती बापट मार्ग, पुणे- १६,<br>२.झोपुप्रा कार्यालयाच्या ww.srapune.gov.in या वेबसाईटवर पाहता येईल. |

अंध, अपंग (दिव्यांग) व विधवा महिला कुटुंबप्रमुख पात्र झोपडीधारक असलेस त्यांनी त्याबाबतचा जिल्हा शल्य चिकित्सक किंवा ससून रुग्णालयाचे अपंगत्व प्रमाणपत्र/ शासकिय पुरावा शुक्रवार दिनांक ०८/१०/२०२१ रोजी कार्यालयीन वेळ संपेपर्यंत झो.पु.प्रा. कार्यालयात सादर करावयाचे आहेत. ४०% पेक्षा कमी अंध, दिव्यांग (अपंगत्वाचा दाखला) सादर करणाऱ्या लाभार्थ्यांची दखल घेतली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

शुक्रवार दिनांक ०८/१०/२०२१ नंतर प्राप्त होणाऱ्या पुराव्याची किंवा पुराव्याच्या अर्जाची कोणतीही दखल घेतली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. सदर पुराव्याची तपासणी ससून रुग्णालयाकडून/ अधिकृत वेबसाईटवरुन ऑनलाईन तपासणी झालेनंतर त्यामध्ये योग्य पुरावा असणाऱ्या लाभार्थ्यांची प्रथम प्राधान्याने सोडत करण्यात येईल. चुकीचा अथवा बोगस पुरावा दाखल केल्यास त्या लाभार्थ्यांवर फसवणूकीचा गुन्हा दाखल करण्यात येईल याची नोंद घ्यावी. सोडत झालेनंतर सदनिका निवडीच्या सवलतीबाबत अर्जाची अथवा सादर केलेल्या पुराव्यांची अथवा अर्जाची दखल घेतली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

लॉटरी प्रक्रिया तसेच निवड झालेल्या अंतिम झोपडीधारकांची यादी याबाबतचा मुख्य कार्यकारी अधिकारी झोपुप्रा पुणे यांचा निर्णय अंतिम राहिल व त्याबाबत या कार्यालयाकडे त्यानंतर कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

सोबत सदनिका वाटपाची कार्यपध्दतीची माहिती डकविण्यात येत आहे.

V. S. Bhalerao 30/9/2021

तहसिलदार (ताबा)

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे